N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): वर्धा **P.S.**(ठाणे): वर्धा
FIR No.(प्रथम खबर क्र.): 1849 **Year** (वर्ष): 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):19/11/2026 12:05

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): दरमियानी दिन
Time Period (कालावधी):
Date From (दिनाक पासून): 16/11/2026
Date To (दिनाक पर्यंत): 18/11/2026
Time From (वेळेपासून): 15:15 बजे
Time To (वेळेपर्यंत): 15:27 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनाक): 19/11/2026 **Time** (वेळ): 09:10 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):
Entry No. (नोंद क्र.): 018
Date & Time (दिनाक आणि वेळ): 19/11/2026 12:05 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 2 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): कैआनंदराव मेघे विद्यालय, , बोरगांव मेघे,वर्धा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भारती देवराव गुरनुले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक ,विभाग, नागपुर,नागपुर,नागपुर शहर,महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक ,विभाग, नागपुर,नागपुर,नागपुर शहर,महाराष्ट्र, भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7721994464

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	संजय माधवराव भस्मे			1. तराळे ले आउट समता नगर, सावंगी मेघे ,वर्धा ,सवंगी मेघे पोलिस स्टेशन,वर्धा,महाराष्ट्र, भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):

पोलीस कार्यवाही दरम्यान लागलेला कालावधी मुळे

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

Scanned with OKEN Scanner

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):
हकीकत - नक्कल लेखी फिर्याद पोलीस स्टेषन वर्धा षहर दिंनाकः- 19/11/2026

माझे नाव भारती देवराव गुरनुले, वय 45 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नागपुर, मोन 7721994464

समक्ष पोलीस स्टेषन सीटी पोलीस स्टेषन वर्धा षहर येथे हजर होउन तक्रार लीहुन देते की, मी मागील 1 वर्शा पासुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग नागपुर येथे कार्यरत आहे.

दिंनाक 12/11/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, प्रषासकिय ईमारत क्र.1, चौथा माळा सिव्हील लाईन, नागपूर येथे कार्यालयात हजर असतांना मा. पोलीस अधीक्षक श्री डॉ. दिंगाबर प्रधान यांनी आम्हाला त्यांचे पोलीस अधीक्षक कार्यालय, ला.प्र.वि. नागपूर येथे बोलावुन त्यांचे कक्षात हजर असलेल्या व्यक्तीस आमचा परिचय करून दिला व त्या व्यक्तीचा परिचय आम्हास प्रविन बाबाराव लोंढेकर , नोकरी - शिक्षकसेवक,कै. आनंदराव मेघे विद्यालय बोरगांव मेघे करून दिला. मा. पोलीस अधिक्षक, लाप्रवि नागपूर साहेबांनी आम्हास सांगितले की, श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांची एका लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणी संबंधाने तक्रार आहे. त्यांना तुमचे कक्षामध्ये घेवून जावून योग्य ती कायदेषीर कार्यवाही करा. त्यावरून आम्ही तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांना आम्ही आमचे कक्षात घेवून आलो. तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर, वय 36 वर्षे, नोकरी - शिक्षकसेवक,कै. आनंदराव मेघे विद्यालय बोरगांव मेघे, रा. सिंदी रेल्वे, ता. सेलु, जिल्हा वर्धा. 442105 हे वेळ अंदाजे 13.00 वा. चे सुमारास आमचे कार्यालयात लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, प्रषासकिय इमारत क्र. 1, चौथा माळा, सिव्हिल लाईन, नागपूर कार्यालयात हजर आले असुन त्यांनी आम्हास एका लोकसेवकांविरूध्द तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून आम्ही त्यास कोरा कागद उपलब्ध करून देउन त्यांची तक्रार लिहुन देण्यास सुचीत केले, त्यानुसार त्यांनी त्यांची हस्तलिखीत तक्रार सादर केली. सदर तक्रारीवर आम्ही समक्ष म्हणून सही केली.

त्यानंतर लाच रक्कम मागणीची पडताळणी व सापळा कार्यवाहीसाठी 2 शासकीय पंचाची आवष्यकता असल्याने आम्ही आमचे कार्यालयातील पोलीस हवालदार विलीन तांबडे यांना 15.00 वाजताचे सुमारास मा. अधीक्षक अभिंयता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांना पत्र देऊन दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत विंनती पत्र देणेकरीता रवाना करण्यात आले. त्यानुसार मा.अधीक्षक अभिंयता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांनी त्यांचे कार्यालयातील श्री. सतिश निंलकठ मारबते, वय 40वर्ष, पद - कनिष्ट लिपीक, व श्री. आकाश सिंध्दाथ पाटील, वय 33वर्ष, पद -षिपाई ,यांना लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, प्रशासकीय इमारत क्र.1, चौथा माळा, सिव्हील लाईन्स् नागपूर येथे पोलीस हवालदार विलीन तांबडे यांचेसह पाठविले. वर नमूद कर्मचारी त्यांच्या कार्यालयातून आमचे कार्यालयात वेळ 16.55 वा. हजर आले. पोलीस हवालदार विलीन तांबडे यांनी त्यांचे सोबत आलेल्या दोन शासकीय कर्मचारी यांची ओळख आम्हास करुन दिली. आम्ही आमची दोन्ही पंचांना ओळख करून देऊन, आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमचेकडे एका लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संबंधी तक्रार आली असून, सदर तक्रारीची लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करावयाची आहे. पडताळणी दरम्यान गैरअर्जदाराकडून लाचेची मागणी झाल्यास त्याअनुरुप लोकसेवकाविरुध्द सापळण्याचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. तरी

होणाऱ्या कार्यवाहीत आपली पंच म्हणुन काम करण्याची तयारी आहे का? असे विचारल्यावर दोन्ही पंचानी पडताळणी व सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्षविली. त्याबाबतचे संमतीपत्र दोन्ही पंचाकडून लिहून घेण्यात आले.

त्यानंतर आम्ही पंचाना तक्रारदार यांनी लीहुन दिलेली तक्रार दाखविली असता ती, खालीलप्रमाणे,

माझे नाव:- श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर, वय 36वर्शे, नोकरी-कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) येथे शिक्षणसेवक, रा. सिंदी रेल्वे, ता. सेलु, जिल्हा वर्धा. 442105. मो.नं. 9021312141

मी वर नमुद पत्यावर परिवारासह जन्मापासून राहतो व कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे)येथे शिक्षणसेवक या पदावर दिंनाक 06/08/2025 पासून नोकरी करित आहे.

मी नमुद षाळेत नोकरीवर हजर होण्यापूर्वी सन 2025 मध्ये टॅट (TAIT) पवित्र पोर्टलद्वारे परिक्षा दिली होती. त्याचा निकाल लागला, असून मला जिल्हापरिशद वर्धा येथे जिल्हापरीषद शाळा चाकुर, ता. समुद्रपुर, जि. वर्धा येथे प्रशासकिय नोकरी लागलेली आहे. तेथे मला हजर होण्याकरिता मी नोकरी करित असलेल्या कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) येथुन मला कार्यमुक्तचा आदेष आवष्यक असल्याने मी दिंनाक 04/11/2026 रोजी मा. सचिव, विंदभ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती यांना शाळेच्या मुख्याध्यापक मार्फतीने अर्ज देण्याकरिता मा. मुख्याध्यापक, कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) यांचेकडे कार्यमुक्त करण्याबाबत अर्ज दाखल केलेला होता. परंतु त्यांनी तो घेण्यास नकार दिल्याने मी श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याध्यापक, कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) यांना नमुद अर्ज न घेण्याबाबत कारण विचारले असता त्यांनी मला म्हटले की, ''तुला कार्यमुक्त होण्याकरिता मला 2,75,000/-रूपये दयावे लागेल'' त्यावर मी त्यांना विचारले की, नियमाने तुम्ही मला कोणत्याही प्रकारचे पैसे न घेता कार्यमुक्त करायला पाहिजे. परंतु त्याच्यावर श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याध्यापक, कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) हे काहीही न एकता ''मला 2,75,000/-रूपये दयावे लागेल, त्यानंतरच मी त्याच दिवषी तुला कार्यमुक्त करण्याचा आदेष देतो'' असे बोलुन मला पैषाची मागनी करून माझा अर्ज व कोणतेही कागदपत्र स्विकारले नाही. त्यामुळे मी स्पीड पोस्टाने दिंनाक 04/11/2026 रोजी माझा अर्ज सर्व कागदपत्रासह षाळेच्या पत्त्यावर पाठविला. त्यावर त्यांनी पोस्टाला षाळेला दिवाळीच्या सुट्टया असल्याने नमुद अर्ज स्विकारता येत नाही असे बोलुन नमुद अर्ज पोस्टाला परत केला. पोस्टाद्वारे माझा अर्ज मला परत मिळाला आहे.

त्यानंतर मी दिंनाक 09/11/2026 रोजी श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याध्यापक, कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे) यांचे मोबाईल क्र. 9970260248 यावर माझ्या मोबाईलने सकाळी 10.00 वाजताचे सुमारास फोन लावून बोललो की, माझ्या कार्यमुक्ती आदेषाचे काय झाले त्यावर त्यांनी मला बोलले की, तुला सांगितलेली रक्कम पुर्णच दयावी लागेल , त्यावर मी बोललो की मी तुम्हाला सध्याचे 1,00,000/- रूपये देतो. त्यावर ते पुन्हा बोलले की, तुला पुर्ण ओके करावे लागेल व पोस्टाने का बर अर्ज पाठविला तु ऑफिसला येवून भेट असे बोलुन फोन ठेवला.

परंतु मला नमुद लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नागपूर यांचे कार्यालय, प्रषासकिय इमारत क्र. 01, दुसरा माळा सिव्हील लाईन येथे जावून माझी तक्रार केली. लाचेची मागणी करणारे गैरअर्जदार श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याध्यापक, कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव यांचेषी माझे कोणत्याही प्रकारचे पुर्ववैमनस्य नसुन कोणतेही देवानघेवानीचे संबंध नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारचा वादविवाद, भांडणतंटा नाही.

मी माझे वैयक्तिक बचतीतील 1,00,000/- रूपये लाच रक्कम म्हणुन वापरावयास समक्ष सादर करीत आहे.

परंतु मला नमुद लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नागपूर यांचे कार्यालय, प्रषासकिय इमारत क्र. 01, दुसरा माळा सिव्हील लाईन येथे जावून माझी तक्रार केली.

लाचेची मागणी करणारे गैरअर्जदार श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याध्यापक, कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव यांचेषी माझे कोणत्याही प्रकारचे पुर्ववैमनस्य नसुन कोणतेही देवान घेवानीचे संबंध नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारचा वादविवाद, भांडणतंटा नाही.

मी माझे वैयक्तिक बचतीतील 1,00,000/- रूपये लाच रक्कम म्हणुन वापरावयास समक्ष सादर करीत आहे.

अषी तक्रार पंचानी वाचुन तक्रारीबाबत तक्रारदार यांचेशी तोंडी विचारपुस करून ती बरोबर असल्याची खात्री केल्यावर त्यावर दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या व त्यानंतर सदरची तक्रार आम्ही संगणकावर टंकलीखीत करून

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या. वरील नोटा आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोग व अँथ्रॉसीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रॉसीन पावडर हे अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात तपासल्यास पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. साध्या प्रकाषात तषी चकाकी दिसून येत नाही. अँथ्रॉसीन पावडर ही लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना लावली जाते. त्या नोटा जो कोणी हाताळेल त्याचे हातास नोटावरील काही पावडर चिपकते. तसेच त्या नोटा ज्या ठिकाणी ठेवल्या जातात त्या ठिकाणी ही पावडर चिपकते. सदर ठिकाणी व नोटा हाताळलेल्या व्यक्तीचे हात अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात तपासल्यास अँथ्रॉसीन पावडर लागलेल्या ठिकाणी निळसर रंगाची चकाकी दिसून येते. त्यानंतर महिला अंमलदार अस्मिता मेश्राम यांना प्रात्याक्षिक करुन दाखविण्यास सांगितले. त्याप्रमाणे महिला अंमलदार अस्मिता मेश्राम यांनी कार्यालयातील लोखंडी कपाटातुन एक सिंलबद लिपाफा बाहेर काढला. दोन्ही पंचांनी सदर लिपाफा सिंलबद असल्याची खात्री केल्यावर महिला अंमलदार अस्मिता मेश्राम यांनी लिफापा फाडून त्यामधुन अॅंथ्रॉसीन पावडर लेबल असलेली एक प्लास्टिक डब्बी बाहेर काढुन तक्रारदार व पंचाना दाखविली. दोन्ही पंचासमक्ष त्या डब्बीचे झाकण उघडून त्यामधील पावडर महिला अंमलदार अस्मिता मेश्राम यांनी आपल्या हाताच्या बोटास लावून त्या बोटाने एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर रेष मारुन दाखविली. ती रेष कार्यालयात उजेडामध्ये दिसत नव्हती. त्यानंतर कार्यालयाचे दारे, खिडक्या व विद्युत दिवे पुन्हा बंद केली व प्रकाशाची तिव्रता कमी करुन त्या कागदावर अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता कागदावर बोटाने रेश मारलेल्या ठिकाणी अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली. नंतर दारे खिडक्या उघडून विद्युत दिवे लावून प्रकाश पुर्ववत केला असता कोणतीच चकाकी दिसून आली नाही. तद्नंतर लाच कार्यवाही जमा केलेल्या 500/- दराच्या 200 चलनी नोटा असे एकुण 1,00,000/- रूपये व 500/-रूपये दराच्या भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा असे एकूण 1,75,000/-नकली रूपये असे एकूण 2,75,000/-रू. असल्याचे दोन्ही पंचानी खात्री केली. वरील नोटा आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. चलनी नोटां नंबरची पाहणी करून चलनी नोटांना व नकली नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. स्वतंत्र लिफाफयात सदर नोटा ठेवण्यात आल्या व महिला अंमलदार अस्मिता मेश्राम यांना सापळा कार्यवाहीतुन वगळण्यात आले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्यांना माहिती दिली की, आमचे कार्यालयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरचा तक्रारदार व गै.अ. यांच्यात सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान होणारे संभाशण रेकॉर्ड करण्याकरिता उपयोग करण्यात येणार आहे. सदर उपकरण रेकॉर्डींग मोडवर सुरू केल्यास रेकॉर्ड झालेल्या संभाशणाची व्हॉईस फाईल अँटोमॅटीकपणे तयार होत असून जर हे उपकरण बंद झाले तर रेकॉर्डींग सुध्दा बंद होते आणि व्हॉईस फाईल बंद होते. आणि पुन्हा जर रेकॉर्डींग मोडवर सुरू केले असता नविन व्हॉईस रेकॉर्डींग फाईल तयार होते व पुर्वीची रेकॉर्ड फाईल खराब होत नाही किंवा त्यावर पुनर्लिखान किंवा पुर्नमुद्रीत होत नाही. सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ''सोनी'' कंपनीच्या बनावटीचे आय.सी.डी.-पी.एक्स 470 मॉडेलचे असून त्यात 2 GB इंटरनल मेमोरी आहे. आमचे सुचनेवरून महिला अंमलदार स्वाती हिंडोरीया यांनी पंचासमक्ष आलमारीतून नवीन सिंलबद प्लास्टीकचे पाकीट काढले त्यातीलSanDisk micro SDHC Card 32 GB मेमरी कार्ड दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्यांना दाखवून व्हॉईस रेकॉर्डर स्वीच ऑन करुन मेमोरी कार्डचे महत्व समजावून सांगितले. तसेच व्हॉइस रेकॉर्डर तपासले असता इंटरनल मेमोरीमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हॉईस रेकॉर्डींगची फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यांनतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सांगितले की, सापळा पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड होणारे संभाषण मेमोरी कार्ड मध्ये मुद्रीत होईल त्यानंतर ते मेमोरी कार्ड ताब्यात घेवून एका लिपाफ्यात ठेवून आमचे व पंचाचे सहीने सिंलबद करण्यात येईल. अषी माहीती देउन तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांनी दिलेल्या तक्रारीची शहानिषा करण्याकरीता तसेच गैरअर्जदार यांची तक्रारदारास खरचं लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत तक्रारदार यांना गैरअर्जदाराकडे पंच क्र. 1 यांचेसह प्रत्यक्ष पाठवुन लाचेच्या मागणी संबंधात सापळा पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी तक्रारदार व पंचांना सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे पंच क्र. 2 यांना रक्कम लिपाफ्यातुन काढुन तक्रारदार यांचेकडे देण्याबाबत तसेच गैरअर्जदार यांना लाच रक्कम दिंल्यानतर ती जप्त करण्याच्या प्रक्रीयेबाबत सुचना दिल्या. गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी करण्याची तक्रारदार, दोन्ही पंच व सर्व सापळा पथकानुमते ठरविण्यात आले. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सर्व सदस्यांना कार्यवाहीबाबत गोपनीयता बाळगून या सापळ्याची तसेच तक्रारदार व गैरअर्जदार यांचेबाबत कुठेही वाच्यता करू नये याबाबत सुचना दिल्या. तक्रारदार व दोन्ही पंचास लाचमागणी व सापळा पथकास सापळा कार्यवाही करीता दिनाक 13/11/2026 रोजी सकाळी

08.00 वा ला.प्र.वि. कार्यालय, प्रशासकीय इमारत 1, चौथा माळा सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे हजर राहणेबाबत सुचित करण्यात आले.

त्यानंतर आम्ही, दिनांक 13/11/2026 रोजी सापळा पडताळणी कार्यवाही करिता दोन्ही पंच व सापळा पथक असे वेळ 09.35 वा. आमचे ला.प्र.वि. कार्यालयातुन रवाना होवून वर्धा बायपास रोडजवळ वेळ 11.05 वा. पोहचलो. तक्रारदार यांनी गैरअर्जदार मुख्याध्यापक श्री . संजय माधवराव भस्मे हे शाळेत हजर नाही. शाळा बंद असून ते कोणत्यातरी कार्यक्रमात गेलेले आहे. गैरअर्जदार हे आज शाळेत येणे शक्य नाही असे खात्रीशीर माहिती तक्रारदार यांनी आम्हास सांगितल्याने दिनांक 13/11/2026 रोजी गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी करता आली नाही. त्यानंतर दिनांक 14/11/2026 व 15/11/2026 रोजी षनिवार, रविवार असल्याने दिनांक 16/11/2026 रोजी गैरअर्जदार यांची लाच रक्कम मागणीची पडताळणी करण्याची तक्रारदार, दोन्ही पंच व सर्व सापळा पथकानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार दिनांक 16/11/2026 रोजी आम्ही, वर नमुद दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य-पोहवा विलीन तांबडे, पोलीस अंमलदार मनिश नेवारे , महिला पोलीस अंमलदार स्वाती हिंडोरीया व चालक महिला पोलीस अंमलदार हर्शलता भरडकर असे सापळा पथक तयार करुन वेळ 12.10 वा. कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे), वर्धा येथे जाण्याकरीता सापळा कार्यवाहीचे सर्व साहित्य- ट्रॅपबॅग, लाचरक्कम ठेवून असलेल खाकी लिफाफा (ज्यात रु. 500/- दराच्या एकुण 200 चलनी नोटा एकुण 1,00,000/- रूपये व तसेच 500/-रुपये दराच्या भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा एकूण 1,75,000/- नकली रूपयांचा नोटा असे एकूण 2,75,000/- रूपयांच्या नोटा), काळा कापड, लॅपटाप व प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट लाईट, व्हॉईस रेकॉर्डर, नवीन मेमोरी कार्ड, सिलींग लेबलींगचे साहित्यासह शासकीय वाहन क्र.एम.एच-31-जी.जी.-1536, वाहनाने कार्यालयातून रवाना झालो. तसेच तक्रारदार हे सिंधी रेल्वे, ता. सेलु, जि. वर्धा येथे राहत असल्याने त्यांना नागपूर येथिल लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात नागपूर येथे न बोलावता त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा येथे भेटण्या करिता सांगितले होते. आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा येथे वेळ 13.35 वा. पोहचलो तेथे आम्हाला तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर भेटले. त्यानंतर वर नमुद दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सापळा पडताळणी कार्यवाहीबाबत माहिती देवून तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सापळा पडताळणी वेळी घ्यावयाच्या दक्षता बाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले. तक्रारदार यांची अंगझडती यादी तयार करुन तक्रारदार यांना त्यांच्या वस्तु वेळीच परत करुन त्यांचे वस्तु परत मिळाल्याबाबत त्यांनी सही घेवून आम्ही, दोन्ही पंच यांनी सहया केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही "सोनी" कंपनीचे ICD-PX470 मॉडेलच्या व्हॉईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमोरी कार्डSanDisk micro SDHC Card 32 GB 5411XV8715SC BM MADE IN CHINA टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंच क्र. 1 यांच्या आवाजात तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांचेसोबत गै. अ.श्री. संजय माधवराव भस्मे यांचे कडे लाच रक्कमेच्या पडताळणीसाठी पाठविण्याकरीता वेळ 15.15 वा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंच व तक्रारदार यांचे नाव व दिनाकासह पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाषण ध्वनीमुद्रीत करुन होल्ड मोड वर करण्यात आले. त्यानंतर मॅग्नेटिक सिल करुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळ्यात कापडयाच्या आत सहज दिसुन येणार नाही या पध्दतीने अडकवण्यात आला. त्यानंतर तक्रारदार आणि पंच क्र. 1 यांना गैरअर्जदार श्री. संजय माधवराव भस्मे यांना भेटण्याकरीता तक्रारदार यांचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. 32 ए.ए. 2395 याने कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगाव (मेघे) ता. जि. वर्धा येथे जाण्याकरीता रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 2 तेथेच तक्रारदार यांची परत येण्याची वाट पाहत थांबून राहीलो. यानंतर अंदाजे अर्ध्या तासाने तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा या ठिकाणी परत आले. त्यानंतर तक्रारदार यांचे जवळील व्हॉईस रेकॉर्डर आम्ही ताब्यात घेवून होल्डमोड वरुन काढून पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 15.48 वा. बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेसह आमचे जवळुन गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांना भेटण्याकरीता कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगाव (मेघे) ता.जि. वर्धा येथे गेल्यावर काय घडले याबाबत पंच क्र. 2 व सापळा पार्टीच्या सदस्यांसमोर हकिकत विचारली असता, त्यांनी सांगितले की,"मी व तक्रारदार कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगाव (मेघे) येथे गेलो असता गैरअर्जदार मुख्याध्यापक श्री. संजय भस्मे यांना भेटण्याकरीता त्यांचे कक्षात गेलो असता गैरअर्जदार श्री. संजय भस्मे हे त्यांच्या कक्षात हजर मिळून आले. तक्रारदार यांनी मे आय कमींग सर म्हणून मला त्यांचे कक्षात घेवून गेले त्यावरुन मला ते गैरअर्जदार मुख्याधापक आहे हे माहिती पडले. तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांना बोलले की," सर काही कार्यमुक्तता बाबत, मी करुन राहिलो ॲग्जेस्ट पण तेवढा अमांउट होत नाही आहे. पुर्णच दयावे लागेल का पायने तिन लाख " त्यावर गैरअर्जदार "हो, तु लगेच दे लगेच मोकळा हो, तुला काय पाहिजे ते कागद लगेच देतो "

Scanned with OKEN Scanner

बोलले त्यावर तक्रारदार बोलले की,'' कस आहे आता पावने तिन लाख रूपये जुळवण कठीन होते सर'' त्यावर गैरअर्जदार बोलले की,'' बरोबर आहे पुर्णच कर, त्याच्यात काहीच कमी नाही. कारण त्याच्यात तुला माहित आहे काही शालेचेच आहे त्याच्यात... '' त्यावर तक्रारदार बोलले की,''कार्यमुक्तता साठी येवढा अमाउंट काही दिला तर नाही चालेल आता सध्या'' त्यावर गैरअर्जदार बोलले की, ''नाही नाही, पुर्ण कर त्याच्यात काहीच कमी होत नाही. तु कर अजुन वेळ आहे तुले, मी तुला त्याच दिवशी काम करतो लागन त, तुले काही अडथळा येवू देणार नाही. आपला विषय अडला आहे तिथच तो विषय मोकळा कर असे म्हणून मला पाहुन कोण आहे तुझे हे काय आडनांव यांच '' त्यावर तक्रारदार बोलले की, '' माझा माम भाऊ, मारबते, मी हे म्हणत होतो तुम्हाला की आता काही अमांउट घेवून घ्या मग लागल तर सेवाजोडसाठी अडवान'' त्यावर गैरअर्जदार यांनी नकार दिला. त्यावर तक्रारदार बोलले की, ''अमाउंट केला की कागद?'' त्यावर गैरअर्जदार बोलले की, करून देतो, विषय संपला, बाकी काही नाही. दहा दिवसानी ये पंधरा दिंवसानी ये'' त्यानंतर तक्रारदार बोलले की ''काही कमी करा बा आता त्याचात'' त्यावर गैरअर्जदार बोलले की, '' नाही नाही, कमी नको बोलु आता'' त्यावर तक्रारदार बोलले की, '' किती करू मग मी टोटल, किती काही रांउड फिगर '' त्यावर गैरअर्जदार बोलले की, '' नाही, नाही, काही राउंड फिगर नाही तेच जे तुला हिषोबात सांगितले'' व इतर गोष्टी केल्या. त्यावर आम्ही तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असुन त्यास दुजोरा दिला.

सदर संभाशण व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये ''Folder 01'' मधील फाईल क्र 261116_1515 मध्ये रेकॉर्ड झाले असल्याचे दिसून आले. सदर संभाषण शासकीय लॅपटॉपमध्ये कॉपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे बरोबर असुन गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांनी केलेल्या लाच रक्कमेची मागणी केल्याची सापळा पथकाने खात्री केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांची सापळा पडताळणी नंतरची अंगझडती दोन्ही पंचासमक्ष घेतली. अंगझडतीची हस्तलिखीत यादी तयार करून आम्ही, दोन्ही पंच यांनी सहया केल्या. तसेच तक्रारदार यांचे अंगझडतीत मिळालेल्या वस्तु वेळीच परत केल्या. त्यांनी वस्तु परत मिळाल्याबाबत सही केली.

त्यानंतर तक्रारदार यांनी लाच रक्कम गोळा करण्यास वेळ मागितल्याने लगेच सापळा कार्यवाही करणे योग्य वाटत नसल्याने तक्रारदार यांनी लाच रक्कम दिंनाक 18/11/2026 रोजी देणे उचीत राहील असे सांगितल्यावरून सर्वानुमते सापळा कार्यवाही दिंनाक 18/11/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार सिंधी रेल्वे, ता. सेलु, जि. वर्धा येथे राहत असल्याने त्यांना लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय नागपूर येथे न बोलवता त्यांना दिंनाक 18/11/2026 रोजी 11.00 वाजा कृशी उत्पन्न बाजार समिती वर्धा येथे भेटण्याकरिता सांगून नमुद घटणेची गोपनीयता बाळगून कुठेही वाच्यता करू नये याबाबत सुचना देवून आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक परत लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय, प्रषासकिय इमारत क्र. 1, चौथा माळा, नागपूर करिता वेळ 16.55 वाजता रवाना होवून वेळ 18.35 वाजता पोहचलो. त्यानंतर सापळा पथकातील मपोअं. स्वाती हिंडोरीया हस्ते पडताळणी कार्यवाही मध्ये तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर आणि गैरअर्जदार श्री. संजय माधवराव भस्मे यांचे व्हाईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाची कार्यालयीन संगणकावर शब्दषः स्क्रिप्ट तयार केली. नमुद शब्दषः स्क्रिप्ट 'परिशिष्ट अ' नुसार जोडण्यात आलेली आहे.

त्यानंतर वरीलप्रमाणे SanDisk micro SDHC Card 32 GB 5411XV8715SC BM MADE IN CHINA या कंपनीचे मेमोरी कार्ड मध्ये रेकार्ड झालेली फाईल क्र. 261116_1515 या फाईलचे महिला पोलीस अंमलदार स्वाती हिंडोरीया यांचे मार्फतीने SEVENZA HASH CALUCULATOR या अप्लीकेशन सॉप्टवेअरच्या MD5 Algorithm साहाय्याने हॅष व्हॅल्यु काढण्यात आली असता BOC78AE9A72E13B6BEA94E3944EC9CBA अशी निंमाण झाली. आम्ही शासकिय संगणकावरून, प्रिंटरच्या सहय्याने हॅष व्हॅल्यु चे प्रमाणपत्र प्राप्त करून त्यावर मपोअं. स्वाती हिंडोरीया व दोन्ही पंचानी तसेच आम्ही समक्ष म्हणून सहया केल्या. सदर प्रमाणपत्र तपासाचे कागदपत्रात संलग्न केले. डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड बाहेर काढले. सदर मेमोरी कार्ड SanDisk micro SDHC Card 32 GB 5411XV8715SC BM MADE IN CHINA प्लास्टीकच्या केस मध्ये टाकुन प्लास्टीक केस एका कागदी लिफाप्यात ठेवुन सदर लिपाफा डिंकाने चिटकवुन सदर लिपाफा लाखेच्या सहाय्याने षासकिय मोहर लावुन सिंलबद करून त्यावर पेनने प्रदर्श Pअशी निशाणी दिली. आमचे व दोन्ही पंचांच्या सहीचे मेमोरी कार्डचे वर्णन असलेले लेबल सिंलबद लिपाफ्यावर चिटकविण्यात आले.सदर नमुद लिपाफा कार्यालयीन आलमारीत सुरक्षित ठेवण्यात आला.

तक्रारदार व गै.अ. श्री. संजय भस्मे यांची आज रोजी भेट होवून लाचेच्या मागणीची पडताळणी झाली आहे. सर्वानुमते दिंनाक 18/11/2026 रोजी सापळा कार्यवाही करण्याचे ठरल्याने दोन्ही पंच व सापळा पथक यांना दिंनाक 18/11/2026 रोजीचे सकाळी 09.00 वाजता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय, प्रशासकिय

Scanned with OKEN Scanner

इमारत क्र. 1,चौथा माळा,सिव्हील लाईन नागपूर येथे हजर राहण्याबाबत सुचीत करून गोपनियता बाळगण्याची सुचना देण्यात आल्या. त्यानुसार दिनाक 18/11/2026 रोजी आम्ही, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे दिनाक 16/11/2026 रोजी केलेल्या सापळा पडताळणी पंचनामा कार्यवाही दरम्यान दिलेल्या सुचनेप्रमाणे सकाळी 09.00 वाजता लाचलुचपत प्रतिबधक विभाग कार्यालय, प्रशासकिय इमारत क्र. 1, चौथा माळा, नागपूर येथे हजर आले. त्यानंतर आज रोजी सापळा कार्यवाही करीता कै.आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे), वर्धा येथे जाण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार आम्ही, वर नमुद दोन्ही पंच, सापळा पथकातील सदस्य-पोहवा विलीन तांबडे, पोलीस अंमलदार मनिश नेवारे , महिला पोलीस अंमलदार स्वाती हिंडोरीया व चालक महिला पोलीस अंमलदार हर्शलता भरडकर असे सापळा पथक तयार करून वेळ 09. 45 वा. कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव (मेघे), वर्धा येथे जाण्याकरीता सापळा कार्यवाहीचे सर्व साहित्य- ट्रॅपबॅग, लाच रक्कम ठेवून असलेला खाकी लिफाफा (ज्यात रू. 500/- दराच्या एकुण 200 चलनी नोटा एकुण 1,00,000/- रूपये व 500/-रूपये दराच्या भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा एकूण 1,75,000/- नकली रूपयांचा नोटा असे एकूण 2,75,000/- रूपयांच्या नोटा), काळा कापड, लॅपटाप व प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट लाईट, व्हॉईस रेकॉर्डर, नवीन मेमोरी कार्ड, सिलींग लेबलींगचे साहित्यासह शासकीय वाहन क्र.एम.एच-31-जी.जी.-1536 वाहनाने कार्यालयातून रवाना झालो. तसेच तक्रारदार हे सिंधी रेल्वे, ता. सेलु, जि. वर्धा येथे राहत असल्याने त्यांना नागपूर येथिल लाचलुचपत प्रतिबधक विभाग कार्यालयात नागपूर येथे न बोलावता त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा येथे भेटण्या करिता सांगितले होते. आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक कृशी उत्पन्न बाजार समिती वर्धा येथे वेळ 11.10 वा. पोहचलो तेथे बाजाराची गर्दी असल्याने आम्ही जवळच असलेल्या रेल्वे स्टेशन वर्धा मागील पार्किंग भागात जावून थांबलो व तक्रारदार यांना त्याबाबत माहिती देवून तक्रारदार यांची आम्ही रेल्वे स्टेशन वर्धा मागील पार्किंग भागात वाट बघत थांबलो. तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर हे वेळ 12.05 वाजता आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांना व पंच क्र. 1 श्री
सतिश निंलकठ मारबते तसेच पंच क्र. 2 यांना सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाची खबरदारी बाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. तक्रारदार यांची अंगझडती यादी तयार करून आम्ही, दोन्ही पंच यांनी सहया केल्या तसेच तक्रारदार यांनी त्यांचे वस्तु परत मिळाल्याबाबत सही केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांना आम्ही ''सोनी'' कंपनीचे ICD-PX470 मॉडेलच्या व्हॉईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमोरी कार्ड SanDisk micro SDHC Card 32 GB 5334XV5613LV BM MMADE IN CHINA टाकुन आज रोजी 15.10 वाजता व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. 1 यांच्या आवाजात तक्रारदार श्री. प्रविन बाबाराव लोंढेकर यांचेसोबत गै.अ.श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याद्यापक कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे यांचेकडे लाच रक्कम देण्याकरिता पंच व तक्रारदार यांचे नाव व दिनाकासह पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाषण ध्वनीमुद्रीत करून होल्ड मोड वर करण्यात आले. त्यानंतर मॅग्नेटिक सिल करून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात कपडयाच्या आत सहज दिसुन येणार नाही या पध्दतीने अडकवण्यात आला. त्यानंतर तक्रारदार यांचे काळया रंगाच्या बॅग मध्ये पंच क्र. 2 यांच्या हस्ते ट्रपबॅग मध्ये असलेल्या लिपाफ्या मधील लाचरक्कम (ज्यात रू. 500/- दराच्या एकुण 200 चलनी नोटा एकुण 1,00,000/- रूपये व व 500/-रूपये दराच्या कागदी भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा असे एकूण 1,75,000/- नकली रूपये असे एकूण 2,75,000/- रूपये), ठेवले व तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर आणि पंच क्र. 1 यांना गै.अ.श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याद्यापक कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे यांना भेटण्याकरीता तक्रारदार यांचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. 32 ए.ए. 2395 याने कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे येथे रवाना केले. त्यांच्या मागोमाग आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सदस्य पोहवा. विलीन तांबडे, पोअं. मनिश नेवारे, मपोअं. स्वाती हिंडोरीया, चामपोअं. हर्शलता भरडकर, हया षासकिय वाहन क्र.एम.एच-31-जी.जी.-1536 मध्ये कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे , वर्धा येथे जाण्याकरीता रवाना झालो. त्यानंतर आम्ही व सापळा पथक बसून असलेली वर नमुद चारचाकी वाहन तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. 32 ए.ए. 2395 चे मागोमाग जावून तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांनी त्यांची नमुद दुचाकी वाहन कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे येथे पाळेच्या मोकळया परिसरात उभी केल्याने आम्ही त्यांच्या थोडया अंतरावर पाळेच्या समोर असलेल्या गुरूदेव मंदीरच्या बाजुला चारचाकी वाहन उभी केली. आमचे वाहनातून सापळा पथकातील सदस्य पोहवा. विलीन तांबडे, पोअं. मनिश नेवारे व पंच क्र. 2 हे उतरून गुरूदेव मंदीर परिसरात जावून थांबले व आम्ही थोडया 50 मीटर अंतरावर सापळा पथकातील मपोअं स्वाती हिंडोरीया आमचे सोबत आमचे चारचाकी वाहनांजवळ कुणालाही संषय येणार नाही असे आडोसा घेवून उभे होतो.

Scanned with OKEN Scanner

तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर व पंच क्र. 1 श्री. सतिश मारबते हे गै.अ.श्री. संजय माधवराव भस्मे, मुख्याद्यापक कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे यांना लाचरक्कम देण्याकरिता त्यांचे कक्षात जावून काही वेळ दोघे बोलल्यानंतर तक्रारदार यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9021312141 चे वॉट्सअप वरून पोहवा विलीन तांबडे यांचे मोबाईल क्र. 9823633878 चे वॉट्सअप वर मिस कॉल करू आम्हाला गै.अ. श्री. संजय भस्मे यांनी लाच रक्कम स्विकारल्या बाबत इषारा दिल्याने आम्ही, पंच क्र. 2, व सापळा पथकातील पोहवा विलीन तांबडे, पोअं. मनिश नेवारे, मपोअं. स्वाती हिंडोरीया, असे सर्व कै. आनंदराव मेघे विद्यालय परिसरात मुख्याद्यापक यांचे कार्यालयाकडे धाव घेतली असता तक्रारदार यांनी आम्हाला इशारा करून गै.अ. श्री. संजय भस्मे हे षाळा परिसरातील मैदानातून लाचरक्कम दुसरीकडे घेवून जात असल्या बाबत इशारा दिल्याने तात्काळ सापळा पथकातील पोहवा विलीन तांबडे त्यांच्या मागे धावून त्यांना पकडले तेव्हा त्यांच्या हातात लाल रंगाचे मामा अगरबत्ती नांव लिहलेली मळकट पांढऱ्या रंगाची कापडी थैली होती. त्यांना त्यांच्या हातात असलेल्या कापडी थैली सह त्यांच्या कक्षात घेवून गेले असता आम्ही पंच क्र. 1 यांना विचारले की, लाच रक्कम कोणी स्विकारली तेव्हा त्यांनी गै. अ. श्री. संजय भस्मे यांच्या कडे बोट दाखवून यांनी स्विकारली बाबत सांगितले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना लाच रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारले असता गै.अ. श्री. संजय भस्मे यांच्या हातात असलेल्या थैलीत ठेवल्याबाबत सांगितले. त्यावरून आम्ही पंच क्र. 02 यांचे हस्ते नमुद थैलीत लाच रक्कम असल्याबाबत पाहणी करून नमुद थैली आमच्या ताब्यात घेतले. आम्ही मपोअं.स्वाती हिंडोरीया यांच्या मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्याणची व्हिडीयो शुटींग त्यांचे खाजगी मोबाईलद्वारे करून घेतली. त्यानंतर आम्ही गै.अ. श्री. संजय भस्मे यांना आपला व सापळा पार्टीतील सदस्यांचा व दोन्ही पंचाचा परिचय दिला. त्यावेळी ते घाबरल्याचे दिसून आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर 15.27 वा बंद केला.

आम्ही गैरअर्जदार यांना सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगुण गैरअर्जदार यांना त्यांचे संपूर्ण नाव, पद पत्ता इ. माहिती देण्याबाबत सांगितले असता, त्यांनी आपले नाव-संजय माधवराव भस्मे, वय 54 वर्षे पद मुख्याद्यापक, कार्यालय- कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे, रा. मु.पोस्ट. तराळे ले आउट, समता नगर, सावंगी मेघे, वर्धा पिन कोड नं. 442001, मो.क्र. 9970260248 असे सांगीतले.

त्यानंतर गैरअर्जदार हे पळून जावू नये किंवा कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरिता सापळा पार्टीतील सर्व सदस्यांना सतर्कतेबाबत सुचना देण्यात आल्या. यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र. 2 यांना गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांनी स्विकारलेली लाच रक्कम तीच आहे किंवा कसे? याबाबत खात्री करण्यास सांगीतले. त्यानुसार पंच क्र. 2 यांनी गै.अ. श्री. संजय भस्मे यांचे जवळ असलेल्या थैलीतील लाच रक्कम ताब्यात घेवून त्यातील नोटा मोजण्यास सांगीतले असता त्यात 500/- रू.दराच्या 200 चलनी नोटा असे एकुण 1,00,000/- रूपये व 500/-रूपये दराच्या भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा असे एकूण 1,75,000/- नकली रूपये असे एकूण 2,75,000/- रूपये आढळुण आले.

त्यानंतर सापळा पार्टीतील सदस्य मपोअं. स्वाती हिंडोरीया यांनी ट्रॅप बॅग मधुन अल्ट्राव्हायलेट दिवा व काळा कपडा बाहेर काढून आमचेजवळ दिला. त्यानंतर गै.अ. श्री. संजय भस्मे व आम्ही सर्वजण हजर असलेल्या कै. आनंदराव मेघे विद्यालय येथील गैरअर्जदार यांचे कक्षातील संपुर्ण विद्युत दिवे, खिडकी, दरवाजा बंद करून अंधार करून पंच क्र. 2 यांचे हातातील लाच रक्कमेच्या नोटांवर व नोटा ठेवलेल्या थैलीचे आतमध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासल्या असता, सर्व नोटांवर व थैलीचे आतमध्ये तसेच पंच क्र. 2 यांचे दोन्ही हाताच्या बोटांवर निळसर रंगाची चकाकी दिसुन आल्याचे आमचे व दोन्ही पंचाचे निंदशनास आले.

सदरचे घटनास्थळ हे गै.अ. संजय भस्मे हे मुख्याद्यापक असलेल्या शाळेत असल्याने नमुद ठिकाणी आलेल्या शिक्षक व विंद्याथ्याना त्रास होवू नये व आपले कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये तसेच सुरक्षेच्या दृश्टीने आम्ही सर्व महत्वाच्या नोंदी घेवून तसेच पोलीस स्टेशन वर्धा शहर येथे गै.अ. श्री. संजय भस्मे यांना ताब्यात घेतल्या बाबतची स्टेशनडायरी नोंद करून लाचलुचपत प्रतिबधक कार्यालय, वर्धा, येथे आम्ही पुढील पंचनामा कार्यवाही व ईतर कार्यवाही करण्याकरीता सापळा पार्टी, दोन्ही पंच, तक्रारदार व गै.अ. श्री. संजय भस्मे यांच्या सह शासकिय वाहन क्र. एम.एच-31-जी.जी.- 1536 येथे दिनाक 18/11/2026 रोजी 16.20 वा. हजर आलो.

त्यानंतर सदर नोटा तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांनी दिलेल्याच नोटा असल्याची खात्री केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबधक विभाग, वर्धा येथील कार्यालयात टेबलवर कोरा कागदावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून नोटाचे क्रमांक पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी प्रात्याक्षीक पंचनामा मधील नमुद नोटाच्या क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता 500/-रू. दराच्या 200 चलनी नोटा एकूण 1,00,000/-रूपये नोटांचे क्रंमांक खालीलप्रमाणे दिसुन आले तसेच 500/-रूपये दराच्या भारतीय मनोरंजन बँक असे नमुद असलेल्या 350 नकली नोटा असे एकूण 1,75,000/- नकली रूपये असे एकूण 2,75,000/-रूपये आढळुण आले.

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त नोटा ह्या प्रात्याक्षिक पंचनामा मध्ये नमुद नोटाच्या क्रमांकाशी तंतोतंत जुळुन आल्याने नमुद लाचरक्कम मोठया हिरव्या रंगाच्या लिफाप्यामध्ये ठेवून सिंलबद करून सुरक्षीत ठेवण्यात आली. तसेच नमुद नोटांचे तपशील असलेले लेबल ज्यावर गै.अ. श्री. संजय भस्मे, यांची, आमची व दोन्ही पंचाची स्वाक्षरी घेण्यात आली. त्याचप्रमाणे नमुद नोटा ठेवून असलेल्या मोठया हिरव्या रंगाच्या लिफाप्याचे जप्तीपत्रक तयार करून त्यावर आमची, दोन्ही पंचाची व गै.अ. श्री. संजय भस्मे यांची स्वाक्षरी घेण्यात आली. तसेच गै.अ. श्री. संजय भस्मे यांचा जवळील लाच रक्कम ठेवलेली मळकट पांढऱ्या रंगाची थैली व लाच रक्कम वेळीच वेगळया जप्तीपत्रकान्वये जप्त करण्यात आली. गै.अ.श्री. संजय भस्मे यांची पंच क्र. 2 हस्ते अंगझडती घेवून त्यांच्या कडील साहित्या प्रमाणे यादी तयार करून त्यांचेजवळ असलेल्या सर्व चिज वस्तूंच्या नोंदी घेण्यात आल्या. अंगझडती दरम्यान मिळालेले नगदी 13600/- रूपये व रेडमी कंपनीचा मोबाईल फोन तपासा करिता ताब्यात घेवून जप्तीपत्रकान्वये जप्त करण्यात आले. दोन्ही पंचाची स्वाक्षरी घेवून आम्ही अंगझडती यादीवर समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली. त्याचप्रमाणे तक्रारदार यांची सापळा कार्यवाही नंतरची अंगझडती यादी हस्तलिखीत तयार करून त्यांचेजवळ सापळा कार्यवाही पूर्वी असलेल्या चिज वस्तू असल्याचे दिसून आले. त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. तसेच तक्रारदार यांनी त्यांच्या सर्व वस्तू परत मिळाल्याची स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेसोबत गै.अ. श्री. संजय भस्मे यांना लाच रक्कम देण्याकरीता गै. अ. संजय भस्मे यांचे कै. आनंदराव मेघे विद्या ालय, बोरगांव मेघे येथे गेल्यावर काय घडले याबाबत तक्रारदार, सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र 2 यांचे समक्ष विचारले असता, त्यांनी सांगीतले की, मी तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर, यांचे सह त्यांचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. 32 ए.ए. 2395 मध्ये मागच्या सिटवर बसून गै. अ. संजय भस्मे यांना लाच रक्कम देण्या करिता गेलो असता, तक्रारदार श्री प्रविन लोंढेकर यांनी नमुद दुचाकी वाहन कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे येथे मोकळया जागेत उभी करून गै.अ. श्री. संजय भस्मे यांच्या कक्षात घेवून गेले. तेथे गै.अ. सजय भस्मे हजर होते. तेव्हा गैरअर्जदार यांनी बोलले की, ''या.....आणलेका'' तेव्हा तक्रारदार यांनी बोलले की, ''हो, तुम्ही म्हणल्याप्रमाणे केल सर अरेंज...आज काय आहे मागच '' त्यावर गैरअर्जदार बोलले की, '' चल सरळ टाकुन दे कॅरीबॅगमध्ये'' त्यावर तक्रारदार बोलले की, '' मोजता.... मोजुन घेता'' त्यावर गैरअर्जदार बोलले की, '' नाही विश्वास आहे तुझ्यावर, कीती आहे टोटल '' त्यावर तक्रारदार बोलले की, '' दोन पंच्याहत्तर, आज होईल का कार्यमुक्त '' त्यावर गैरअर्जदार बोलले की, '' कार्यमुक्त वगेरे देतो.....कुठे आहे प्रमाणपत्र अजुन, बाबु..... माझ्या मते तुला लास्ट पे स्लिप बनवा लागते'' त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे बॅग मध्ये ठेवलेली लाचरक्कम गैरअर्जदार यांनी दिलेल्या मळकट पांढऱ्या रंगाच्या थैलीत टाकली. त्यादरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलच्या व्हाटस्अप वरून पोहवा विलीन तांबडे याच्या मोबाईल क्र. 9823633878 च्या व्हाटस्अपवर नियोजीत इशारा मिसकॉल करून इशारा दिला. त्यानंतर गै.अ. श्री. संजय भस्मे हे लाच रक्कम ठेवलेली थैली घेवून जात असतांना सापळा अधिकारी व पथक आले व गै.अ. यांना शाळेतील मैदानातून ताब्यात घेतले व गै.अ. श्री. संजय भस्मे यांच्या कक्षात घेवून आले व मला पोलीस उप अधिक्षक श्रीमती गुरनुले मॅडम नी पंच क्र. 2 व सापळा पथका समोर लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, मी कक्षात हजर असलेले गै.अ. श्री. संजय भस्मे यांचेकडे हाताने ईशारा करून यांनीच लाच रक्कम स्वीकारली असल्याचे सांगीतले.''तसेच लाच रक्कम कुठे ठेवली बाबत विचारले असता मी गै.अ. श्री. संजय भस्मे यांच्या जवळ असलेल्या थैली कडे इशारा करून यामध्ये लाच रक्कम असल्याचे सांगितले. त्यावरून पंच क्र. 2 यांच्या हस्ते नमुद थैलीत लाच रक्कम असल्याची खात्री करून तक्रारदार यांच्या जवळील व्हाईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांच्या आवाजात बंद केला. आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता,त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगीतलेल्या घटनेला दुजोरा दिला.

सदरचे घटनास्थळ हे गै.अ. संजय भस्मे हे मुख्याद्यापक असलेल्या कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे, वर्धा येथील असुन सदर घटनास्थळाच्या पुर्वेस षाळेची इमारत ज्यामध्ये वर्ग भरतात, पश्चीमेस स्टाफरूम व मुख्याद्यापक यांचे कार्यालय, दक्षिणेस शाळेचे मुख्य प्रवेषद्वार व सुरक्षाभिंत, उत्तरेस शाळेतील मोकळ मैदान आहे. तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांनी गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांचेशी लाच रकमेचे देवाण घेवाण झाले ती जागा कै. आनंदराव मेघे विद्यालय,बोरगांव मेघे येथील गै.अ. श्री. संजय भस्मे यांचे मुख्याद्यापकाचे कक्ष आहे.सापळा पार्टी मधील आम्ही, व मपोअं. स्वाती हिंडोरीया घटनास्थळा पासुन पूर्वेस 50 फुट अंतरावर आमचे शासकीय चारचाकी वाहना जवळ होतो. तसेच सापळा पार्टी मधील पोहवा विलीन तांबडे, पोअं. मनिश नेवारे व पंच क्र. 2 हे घटनास्थळा पासुन पूर्वेस अंदाजे 25 ते 30 फुट अंतरावर गुरूदेव मंदीर परिसरात होते. याबाबत सविस्तर नकाशा तयार करण्यात आलेला आहे.

त्यानंतर गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांनी तक्रारदार श्री. प्रविन लोंढेकर यांचेकडून स्वीकारलेली लाच रक्कम 2,75,000/- बाबत त्यांचे काय म्हणणे आहे? त्यांचे लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद

Scanned with OKEN Scanner

आणि पेन त्यांना उपलब्ध करून दिला. यानंतर गै.अ. श्री. संजय भस्मे , मुख्याद्यापक, कै. आनंदराव मेघे, बोरगांव मेघे वर्धा यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.

यानंतर आम्ही मपोअं स्वाती हिंडोरीया यांना सुचना दिली की, सापळा कार्यवाही मध्ये तक्रारदार श्री.प्रविन लोंढेकर व गै.अ. श्री. संजय भस्मे यांचे सापळा कार्यवाही दरम्यान लाच स्विकारतेवेळी व्हाईस रेकॉर्डरव्दारे मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेल्या संभाषणाचे लॅपटॉपवर शब्दश: स्क्रिप्ट तयार करावी. त्यावरून मपोअं स्वाती हिंडोरीया यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील मुळ मेमोरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले तक्रारदार व गैरअर्जदार श्री. संजय भस्मे यांचे संभाषणाची शब्दश: स्क्रिप्ट कार्यालयीन लॅपटॉपवर तयार केली असुन ती 'परिषिश्ट अ-1' प्रमाणे पंचनाम्या सह जोडण्यात आलेली आहे.

यानंतर आम्ही महिला पोलीस अंमलदार स्वाती हिंडोरीया यांना सदर डिवाईस रेकॉर्ड मध्ये सापळा कार्यवाही दरम्यान रेकॉर्ड झालेल्या फाईलची सेव्हनझा हॅष व्हॅल्यु कॅलक्युलेटरच्या सहाय्याने नमुद फाईलची हॅष व्हॅल्यु काढून, हॅष व्हॅल्यु व कलम 63, भारतीय साक्ष अधिनियम अन्वये प्रमाणपत्र देण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी सापळा कार्यवाही दरम्यान रेकॉर्ड झालेली फाईल क्र. 261118_1510 ची सेव्हनझा हॅष व्हॅल्यु कॅलक्युलेटरच्या सहाय्याने हॅष व्हॅल्यु काढली असता 261118_1510 ची हॅष व्हॅल्यु FO19D10AA9118 D 5303CAB4169AE249CD अशी निंमाण झाली. हॅष व्हॅल्यु चे प्रमाणपत्र तयार करून त्यावर मपोअं. स्वाती हिंडोरीया , दोन्ही पंच व आम्ही समक्ष म्हणून सहया करून सदर प्रमाणपत्र तपासाचे कागदपत्रात सलग्न केलेबाबत आम्ही पंचनाम्यात नोंदी घेतलेल्या आहेत.तसेच डीजीटल वॉईस रेकॉर्डर हे शासकीय लॅपटॉशी वेगळे करुन डिजीटल वॉॅईस रेकॉर्डरमधील मुळ मेमरीकार्ड बाहेर काढले सदर मेमरी कार्ड SanDisk micro SDHC Card 32 GB 5334XV5613LV BM MMADE IN CHINA प्लास्टीकच्या केस मध्ये टाकुन प्लास्टीक केस एका कागदी हिरव्या लिपाफ्यात घेऊन लदर लिपाफा डींकाने चिटकवुन सदर लिपाफा लाखेच्या साहाय्याने शासकीय मोहर लावुन सिंलबद करुन त्यावर पेनाने प्रदर्श s अशी निशानी दिली मेमरी कार्डच्या वर्णनाचे कागदी लेबलची व जप्ती पत्रकाची प्रींन्ट काढुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सही केली आमचे व दोन्ही पंच्याच्या सहीचे मेमरीकार्डचे वर्णन असलेले लेबल सिंलबद लिपाफ्यावर चिटकविण्यात आले.

तरी गैरअर्जदार श्री. संजय माधवराव भस्मे, वय 54 वर्षे, पद मुख्याद्यापक, कार्यालय- कै. आनंदराव मेघे विद्यालय, बोरगांव मेघे, रा. मु.पोस्ट. तराळे ले आउट, समता नगर, सावंगी मेघे, वर्धायानी लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांना जिल्हापरिशद येथे षासकिय षिक्षक या पदावर नोकरी लागल्याने नवीन नौकरीच्या ठीकानी रूजु होण्याकरीता त्यांना षाळेतुन कार्यमुक्त केल्याचा आदेषाची आवष्यकता असल्याने नमुद आदेष देण्याकरीता आलोसे मुख्याद्यापक यांनी तक्रारदार यांना 2,75,000/ रू ची मागणी करून स्वीकारल्याने त्यांचेविरूदध कलम 7 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988, सुधारणा 2018 अन्वये कायदेषीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेषीर फिंयाद आहे.

अश्या फिंयादीचे लेखी रिपोतहरीर वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Nagesh Kailash Chatarkar(I (Inspector)) / 15101000402NKCM870K

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

Rank (पद):

No.(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Nagesh Kailash Chat
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 15101000402NKCM870

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with OKEN Scanner